# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**३३६ - २३** **दिनांक : - २८/०९/२०२३**

## महिलेचा रिक्षामध्ये राहीलेला एकुण १,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल केला परत नवघर पोलीसांची कामगिरी

दि.१८.०९.२०२३ रोजी महिला नाम तनुजा रामसिंघ तिखत्री, वय-४५ वर्षे व्यवसाय-नोकरी, रा.रुम नंबर ४०६/बी,वर्धमान कॉम्पलेक्स,गोल्डन नेस्ट भाईदर पुर्व ता.जि.ठाणे यांनी नवघर पोलीस ठाण्यात येऊन सांगितले की सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरातुन गोल्डन नेस्ट येथे जात असताना त्याची लॅपटॉप,मोबाईल व इतर किंमती साहित्य असे एका अनोळखी रिक्षा मध्ये विसरलेले होते.

वर नमुद घटनेची माहिती मिळताच सदरबाबत श्री विजय पवार,वरिष्ठ पोलिस निरीक्षक नवघर पोलिस ठाणे यांच्या सुचनेनुसार सदर घटनास्थळावर जाऊन सी.सी.टी.व्ही ची बारकाईने पाहणी केली असता त्याद्वारे ऑटो रिक्षाचा नंबर मिळवून वाहतुक पोलिस कर्मचारी नितीन बोरसे याच्याकडून रिक्षामालकाशी संपर्क साधून तक्रारदार महीलेची विसरलेली लॅपटॉ्पबॅग व मोबाइल ऑटो रिक्षाचालक याच्या कडे आहे का याची विचारपूस केली असता त्याबाबत त्यासही काही कल्पना नसल्याची समजले परंतु रिक्षाचालक व पोलीस यांनी सदर रिक्षाची पाहणी केली असता महीलेची विसरलेली बॅग सुरक्षित रित्या रिक्षाच्या शिटच्या मागे आढळून आली सदरची बॅग पोलिस उपनिरीक्षक संजय लोखंडेमाळी यानी ताब्यात घेऊन महीलेने सांगितलेल्या वस्तु त्यात सुरक्षितरित्या आढळून आल्या.सदरची बॅग तक्रारदार महिलेस परत दिल्याने तिने नवघर पोलिस ठाणे व रिक्षा चालक यांचे आभार मानले.

सदरची कामगिरी श्री जंयत बजबळे, पोलिस उप.आयुक्त परिमंडळ-०१, श्री उमेश माने-पाटील, सहा.पो.आयुक्त,नवघर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,नवघर पोलीस ठाणे, पो.नि.सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), संजय केदारे (प्रशासन) पो.उप.निरी. संजय लोखंडेमाळी, पो.हवा.नितीन बोरसे, ट्रॅफिक वॉर्डन महेश क्षिरसागर यांनी केलेली आहे.


नवघर पोलीस ठाणे
मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय
वरिष्ठ पोलीस अधिकारी
श्री.रजनीश सेठ
श्री.मधुकर पांडेय
पोलीस आयुक्त
श्री. श्रीकांत पाठक
अपर पोलीस आयुक्त
श्री.जयंत बजबळे
पोलीस उपायुक्त
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
SPACE

------ooooooo------